नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक २०/०३/२०२२

---

## बॅटरी चोरी

**पोलीस स्टेशन कन्हान** – अंतर्गत श्री रुद्रा पेट्रोलपंप कन्हान ०५ किमी उत्तर. यातील फिर्यादी हा त्याचे घरी हजर असता सुपरवायझर ब्रजेस कुर्वे यांनी फोन करुन सांगीतले की, श्री रुद्रा पेट्रोलपंप वर ४० ते ४५ ट्रक उभे होते, त्यातील **०५ ट्रकच्या १० बॅटऱ्या ॲमरॉन कंपनीच्या प्रत्येकी ७,०००/– प्रमाणे किंमती एकुण ७०,०००/– रु माल** दि. १८/३/२०२२ चे रात्री २०/०० वा ते १९/३/२२ चे ०८/०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजेश प्रभाकर हुड वय ४६ वर्ष रा.रायनगर कन्हान ता. पारशिवनी यांचे रिपोर्टवरून पो स्टे कन्हान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास पो.हवा अरूण सहारे मो.क्र. ९३०९५९२५१२ करीत आहेत.

## गंभीर दुखापत करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पोलीस स्टेशन सावनेर** – अंतर्गत मौजा मांडवी, १५ कि मी दक्षिण, दिनांक १८/०३/२२ चे २१/०० वा. यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहत असुन आरोपी याने फिर्यादीचा रेडीयो बंद करून आपल्याकडे ठेवला, **या कारणावरून फिर्यादीने आरोपीला हटकले असता, आरोपी याने फिर्यादी ला घरासमोरील वीट घेवुन हातात पकडुन फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केले व शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अर्जुन पुडलिक बेले वय ४७ वर्ष, रा मांडवी यांचे रिपोर्टवरून आरोपी नामे– पवन विठ्ठल भोंगाडे रा मांडवी यांचेविरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम ३२६, ५०४, ५०६, भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास पो हवा विजय पांडे / मो नं ७९७२४३१२३८ **हे** करीत आहेत.

## गळफास लावुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** – अंतर्गत ग्रॅन्ड विलल कॉलनी बुट्टीबोरी ०२ किमी प., यातील मृतक व फिर्यादी हे पती –पत्नी असुन त्यांच्यात पतीचे दारू पिण्याचे कारणावरून शाब्दीक वाद झाले होते. दिनांक १८.०३.२२ चे१६.३० वा ते २०.०० वा दरम्यान, यातील फिर्यादी ही घराबाहेर शेजारी महीलेसोबत चर्चा करीत होती, त्या दरम्यान **मृतक नामे–डिलेन्द्र होशिरलाल बडोले वय २९ वर्ष रा. बुट्टीबोरी हा घरी एकटाच हजर असताना दारूचा नशेत त्याने स्वताचा किचन रूम मधील छताला असलेला लोंखंडी कडीला इलेक्ट्रीक वायर ने गळफास लावुन आत्महत्या केली.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रियंका डिलेन्द्र होशिशरलाल बडोले वय २६ वर्ष ह.मु ग्रॅन्ड विलल कॉलनी बुटीबोरी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे कलम १७४ जाफौ प्रमाणे मर्ग दाखल करण्यात आला, पुढील तपास सफौ/खंडारे करीत आहेत.

## मोटर सायकल अपघातात मृत्यु

पोलीस स्टेशन कुही :– अंतर्गत मौजा चांपा शिवार २५ किमी पश्चिम, दि. १९.०३.२०२२ चे १०.४५ वा ते ११.२० वा. दरम्यान, यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन **मोटर सायकल हिरो होंन्डा शाईन क्र एम एच ४० एएस ७१४४ च्या चालकास मागुन धडक मारून अपघातात जखमी केले व त्याचे मागे बसलेली त्याची पत्नी नामे– ज्योती सुरेश गेडाम वय ४५ वर्षे. रा पाचगाव हीचे मृत्युस कारणीभुत ठरला व घटनास्थळावरून पळुन गेला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सरतर्फे पो. हवा चांगदेव कुथे पोस्टे कुही यांचे रिपोर्टवरून पोस्टे कुही येथे वाहन चालक आरोपी नामे – वाहन क्र एम एच १५ सी डी ६७७२ कार चा चालक नामे अखिलेश नरेंद्र मेहर वय ३३ वर्षे. रा श्रीनगर वार्ड दुर्गेश्वरी मंदीर जवळ गोंदिया यांचे विरूध्द कलम २७९,३३७,३०४ (अ) भादवी सहकलम १८४,१३४,१७७ मोटर वाहन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री शिवाजी बोरकर पोस्टे कुही मोन ८३२९१३०४५८ हे करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**